# युगप्रवर्तक
# क्रांतिबा



संपादक
डॉ. दुष्यंत मनोहर कटारे
कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय
बाभळगाव, ता. जि. लातूर

Scanned with CamScanner



# क्रांतिबा फुले स्त्रीशिक्षणविषयक विचार

६७

**डॉ. एस. पी. पैकेकरी**
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जि. अहमदनगर

**प्रस्तावना :**

**समाजात माणसाला** 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क, स्वत्त्वाची जाणीव करून देणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्यांना गुरु मानले, ते महात्मा जोतीराव फुले. महात्मा फुले झाले म्हणूनच माणसाला आपण 'माणूस' असल्याची जाण झाली. स्त्रियांना 'आपण गुलाम नाही,' याची जाणीव झाली. महात्मा फुले यांचे समाजकार्य किंवा धर्माची चिकित्सा करण्यापूर्वी स्त्रीची अवस्था नेमकी कशी होती, याचा आढावा घेतल्याशिवाय त्यांच्या कार्याचा आपल्यासारख्या सामान्यांना परिचय होणार नाही. महात्मा फुले यांनी उघड-उघड ब्राह्मणांना व त्यांच्या धार्मिक ग्रंथांना विरोध केला. सर्वसमावेशक, न फसवणारा असा 'सार्वजनिक सत्यधर्म' स्थापन केला; पण ब्राह्मणांचे इतके वर्चस्व आहे की, आजही समाज देवाधर्माच्या नावाने बळी जाताना दिसतो.

अगदी आदिम काळात स्त्री अपत्याला जन्म घालते, म्हणून ती श्रेष्ठ होती. म्हणजे स्त्रीमध्ये अलौकिक शक्ती असल्याचे गृहीत धरून स्त्रीला देवी मानले जात असे, तिची पूजा केली जात असे. तिने शेतीचाही शोध लावला; पण पुरुषांना जेव्हा स्त्रीला अपत्य होण्याचे कारण कळले व नांगराने शेती सुरू झाली, तेव्हा स्त्री दुय्यम झाली. त्यानंतर भारतात येणाऱ्या आर्यांनी तर स्त्रीला रसातळालाच नेऊन ठेवले. त्यांनी काही धर्मग्रंथांतूनच स्त्री किती हीन, पापी, तुच्छ आहे, हे सांगितले व स्त्री दुय्यम गुलाम झाली. तिचे अस्तित्वच संपले. काही ग्रांथिक पुरावे आपण पाहू.

१. पती चारित्र्यहीन, विषयासक्त आणि चांगल्या गुणांचा अभाव असलेला असला, तरी पत्नीने त्याला देवासारखे मानावे.
२. स्त्रियांनी आपल्या पतीची आज्ञा पाळावी, हाच तिचा परमधर्म आहे.
३. पती जिवंत असताना जी स्त्री उपास करते आणि व्रते करते, ती आपल्या पतीचे आयुष्य कमी करते आणि नरकात जाते. ज्या स्त्रीला तीर्थ हवे असेल, तिने आपल्या पतीला स्नान घालावे किंवा त्याचे पाय धुवावे आणि तीर्थ घ्यावे. तिला उत्तम लोकाची प्राप्ती होते.
४. स्त्रीला पतीखेरीज दुसरा लोक नाही. जी स्त्री आपल्या पतीच्या मनाविरूद्ध वागते, ती मरणानंतर पती लोकांना जाऊ शकत नाही. म्हणून तिने पतीविरूद्ध कधीही वागू नये.
५. जी स्त्री आपल्या पित्याच्या कुळाचा अभिमान बाळगते आणि नवऱ्याची अवज्ञा करते, तिच्या हातचे अन्न कुणीही खाऊ नये. अशा स्त्रीला कुलटा समजावे.

**हिंदू धर्म किंवा संस्कृतीमधील स्त्रीशिक्षण :**

काही विद्वानांनी 'वैदिक काळात स्त्रीला शिक्षण मिळत होते,' असे लिहिले आहे. खरेच तिला शिक्षण मिळत होते का? वैदिक काळात स्त्रीला उपनयन संस्कार होता, असे म्हटले जाते. उपनयन हा एक अत्यंत महत्त्वाचा संस्कार होता. विद्यार्जनाचा प्रारंभ करण्यासाठी गुरुच्या जवळ घेऊन जाणे, असा उपनयनाचा अर्थ होता. स्त्रीशिक्षणाबाबत मात्र वडिलांनी किंवा भावाने तिला

ISBN : 978-93-5288-364-6


Scanned with CamScanner